# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- शशांक जोशी

रोज सकाळी, भल्या पहाटे, स्वप्नरंजन करतो
शीत गुलाबी झुळुकेने, मी आनंदीत होतो,
स्वानंद गीत गातो |

नव्या कल्पना, नवी क्षितिजे, नव विषयांची नवी आव्हाने
सहजची पेलीन असे भासता, मी आनंदीत होतो,
स्वानंद गीत गातो |

नवीन चेहरे, नव्या ओळखी, नव शब्दांकित नवीन गीते
चितारीत नव भाव विश्व, मी आनंदीत होतो,
स्वानंद गीत गातो |

आयुष्याच्या चढ उतारी, कधी चांदणे, कधी रखरखही
एक अनाहत साद ऐकता, मी आनंदीत होतो,
स्वानंद गीत गातो |

Anahat Music Therapy